सरपंचांनी व ग्रामपंचायत सचिवांनी त्यांच्याजवळ अनधिकृतरित्या ठेवलेल्या ग्रामनिधीची रक्कम

या बाबतीत पंचायत राज समितीची शिफारस

महाराष्ट्र शासन,
ग्राम विकास विभाग,
परिपत्रक क्र- पीआरसी-१०७७/५७०१/(सीआर-२७११)/२३,
मंत्रालय, मुंबई -४०० ०३२.
दिनांक - १२ सप्टेंबर १९७८

परिपत्रक :- पंचायत राज समितीने १९७६-७७ च्या नवव्या अहवालात अनुक्रमे, शिफारस क्रमांक-२.८, ५.२३, व ८.२३ मध्ये असे मत व्यक्त केले आहे की सरपंच व ग्रामपंचायत सचिवांनी नियमाविरुध्द ग्रामनिधीची रक्कम जवळ बाळगण्याच्या प्रवृत्तीला आळा घालण्याच्या दृष्टीने शासनाने उपाययोजना करावी.

२. मुंबई ग्रामपंचायत अधिनियम १९५८ मधील कलम ३८ चे पोट कलम २ मधील भाग १ मधील उपभाग (ड) अन्वये कोणत्याही एका प्रसंगी आकस्मिक खर्च म्हणून १० रु. इतकी रक्कम खर्च करण्यास सरपंचाना अधिकार आहेत. याशिवाय मुंबई ग्रामपंचायत (ग्रामनिधीची अभिरक्षा व त्यांची गुंतवणूक याबाबत) १९५९ मधील नियम २ प्रमाणे अधिनियमातील तरतूदीनुसार ग्रामपंचायतीला मिळालेल्या सर्व निधीची व दुस-या कोणत्याही कायद्यातील तरतुदीनुसार देय असलेली सर्व रक्कम ग्रामनिधीत तात्काळ जमा करावयाची असते व कोणत्याही परिस्थितीत ग्रामपंचायतीला मिळाल्यापासून सात दिवसाच्या आत जमा करावयाची असते, व नियम ४ मधील तरतुदीनुसार असा निधी किंवा रक्कमा प्रथम जमा केल्याशिवाय त्या वापरण्यात येत नाहीत. याशिवाय पंचायतीस तिच्या सचिवास चालू खर्च भागविण्यासाठी, वाजवी किंमतीस विकण्यात येणा-या मालाची दुकाने चालविणा-या पंचायतींच्या बाबतीत ५०० रुपयाहून अधिक नसेल इतकी व कोणत्याही इतर बाबतीत १५० रुपयाहून अधिक नसेल इतकी कायम स्वरुपाची आगाऊ रक्कम ठेवण्यासाठी परवानगी देता येते. वरील विवेचनावरुन असे दिसून येईल की सरपंच कोणत्याही एका प्रसंगी आकस्मिक खर्चाकरिता १० रुपयाइतकी रक्कम ठेवू शकतात व त्याच्यापेक्षा जास्त असलेली रक्कम जवळ बाळगली असेल तर ती रक्कम त्यांच्याजवळ अनधिकृतपणे ठेवली आहे असे होईल. याशिवाय सरपंचानी घेतलेल्या सर्व रक्कमा सचिवानी घेतलेल्या सर्व रक्कमा ग्रामनिधीत सात दिवसाच्या आत जमा करणे हे उपरोक्त नियमातील नियम २ प्रमाणे सरपंचाचे अवश्य कर्तव्य आहे. राज्यातील एकूण ग्रामपंचायतींच्या संख्येच्या मानाने ग्रामपंचायत सचिवांची संख्या कमी असल्याने काही ग्राम पंचायतीच्या बाबतीत एका ग्रामपंचायतीच्या सचिवांकडे एका ग्राम पंचायतीपेक्षा जास्त ग्रामपंचायतीचा

......२

OFFICE OF THE COLLECTOR
RATNAGIRI
Date 16 SEP 1978
Branch GB

(२२)



कार्यभाग असणे शक्य आहे. व त्यामुळे दररोज अशा ग्रामपंचायतीच्या कामास ग्रामपंचायत सचिव उपलब्ध होऊ शकत नाही. ग्रामपंचायतीचे सरपंच व सचिव संयुक्तपणे ग्रामनिधीतील पैशांचा व्यवहारास जबाबदार असल्यामुळे, ग्रामपंचायती सचिवांच्या गैरहजेरीत ग्रामनिधीच्या सुरक्षित अभिरक्षाबद्दल व रक्कम ग्रामनिधीत जमा करण्याबद्दलची सर्वस्वी जबाबदारी ग्राम पंचायतीच्या सरपंचावर राहाते. यामुळे जिल्हा परिषदांच्या सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी यांना अशी विनंती करण्यात येते की, त्यांच्या अधिकाराखाली असलेल्या गट विकास अधिकारी, विस्तार अधिकारी( पंचायत ) यांनी ग्रामपंचायतीचे सरपंच व सचिव यांच्यावर वर उल्लेख केल्याप्रमाणे ग्रामनिधीबद्दल त्यांनी पाळावयाच्या कायद्याच्या तरतूदी न चुकता प्रमाणित करण्याबाबत त्यांना सूचना देण्यात याव्या. त्यांना अशीही विनंती करण्यात येते की, ग्रामपंचायतीच्या तपासणीच्या वेळी सरपंच व सचिव यांच्याजवळ असलेली रक्कम वेळोवेळी ग्रामनिधीमध्ये जमा केली आहे व जास्त रक्कम त्यांच्याजवळ बाळगलेली नाही याची काटेकोरपणे खात्री करून घ्यावी. पुढे त्यांना अशीही विनंती करण्यात येत आहे की जास्त रक्कम जवळ बाळगली तर त्यांनी ग्रामनिधीच्या रकमेची अफरातफर केली आहे असे होईल व त्यांच्याविरुध्द फौजदारी खटला दाखल करण्यासकट योग्य कारवाई करण्यास ते पात्र होतील असे त्यांच्यावर दडपण आणण्यात यावे. पुढे जिल्हा परिषदेच्या सर्व कार्यकारी अधिकाऱ्यांना अशी विनंती करण्यात येते की, जास्त रक्कम वरचेवर जवळ बाळगणाऱ्या सरपंच व ग्रामपंचायत सचिव विरुध्द त्यांनी कडक कारवाई करावी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

( वि. दी. जोशी )
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रति,

सर्व विभागीय आयुक्त.

जिल्हा परिषदांचे सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी.

सर्व जिल्हाधिकारी.

पंचायत समितीचे गट विकास अधिकारी.